"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार" –

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



कोल्हापूर

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित,

# विवेकानंद कॉलेज,

## कोल्हापूर

प्रकल्पाचे नाव –

**डॉ. एम. एन. श्रीनिवास यांच्या संस्कृतीकरणाविषयक संकल्पनेचा अभ्यास.**

**वर्ग :** बी. ए. भाग तीन सत्र :-

**२०२२-२३**

विभाग प्रमुख (मार्गदर्शक) :

**प्रा. एच. व्ही. चामे**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रतिज्ञापत्र

विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (स्वायत्त) येथे कला शाखा भाग 3 च्या समाजशास्त्र विभागात शिकत असून असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करतो आम्ही आम्ही सादर केलेला प्रकल्प स्वत:च्या अनुभवावर व आधारित आहे मी सत्र 6 च्या अंतर्गत मूल्याकनासाठी सादर केलेला प्रकल्प श्री.एम.एन.श्रीनिवास यांच्या संस्कृतीकरणाविषयक विचारांचा अभ्यास हा विषय व इतर उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेऊन तयार केला आहे. पूर्वी सादर झालेल्या कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करून अथवा इतर कोणाकडून ही लिहून घेऊन हा प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही.

**ठिकाण :** कोल्हापूर

**दि :-**

प्राचार्य विवेकानंद कॉलेज,
कोल्हापूर.

विभाग प्रमुख व मार्गदर्शक
प्रा. एच. ....चामे

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# ऋणनिर्देश

मी बी.ए भाग तीन मध्ये शिकत असून मला "समाजशास्त्र" या विषयाच्या प्रकल्पासाठी मी " डॉ. एम. एन श्रीनिवास" यांची संस्कृतीकरणाची संकल्पनेचा अभ्यास विषय निवडला आहे.

मी हा विषय निवडायाचे कारण म्हणजे सध्याच्या परिस्थितीत समाजव्यवस्थेत झालेले परिवर्तन, लोकांच्या विचारसरणीत झालेले बदल व समाजात संपूष्टांत आलेली जातीव्यवस्था याचा अभ्यास करता आला.

या प्रकल्पाची निवड करण्यासाठी समाजशास्त्र या विषयाचे शिक्षक प्रा. एच. व्ही. चामे सरांनी मार्गदर्शन केले आहे त्यांचे मी मन:पर्वक आभारी आहे. तसेच माझ्या मित्रांनी या प्रकल्पासाठी मदत केली. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मला सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्या सर्वांचा मन:पासून आभारी आहे तसेच कॉलजेच प्राचार्य. डॉ आर. आर. कुंभार सर यांनी मला हा प्रकल्प करण्याची संधी दिली. त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

KOLHAPUR

आपला विश्वासू

अनिकेत गुरूदास पिंगळे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

| अ.नं. | विद्यार्थ्यांचे नाव | रोल नं. | सही | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | स्नेहल दळवी | 4828 | [illegible] | 10 |
| २ | वैभव यादव | 4987 | [illegible] | 09 |
| ३ | शिवानी सूर्यवंशी | 4981 | Suryavanshi | 09 |
| ४ | सानिका कांबळे | 4874 | [illegible] | 09 |
| ५ | अनिकेत पिंगळे | 4951 | ASPingale | 09 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

KOLHAPUR

# अनुक्रमणिका


| क्रमांक | शिर्षक | पृष्ट. क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | 6 |
| २ | उद्दिष्टये | 9 |
| ३ | अभ्यासपद्धती | 11 |
| ४ | डॉ. श्रीनिवास यांचे संस्कृतीकरणा विषयक विचार | 13 |
| ५ | निष्कर्ष | 18 |
| ६ | संदर्भसूची | 19 |
| ७ | ऋणनिर्देश | 3 |
| ८ | प्रमाणपत्र | 20 |



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रस्तावना

भारत हा खेडयांचा देश आहे. खेडयातील समाजाचे वस्तुनिष्ठपणे अध्ययन करण्यासाठी संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोनाचा अवलंब केला जातो. संरचनात्मक दृष्टिकोनाचा अवलंब करताना समाजशास्त्रज्ञांनी वैचारिक मूल्ये व स्थित्यंतरे यावर विशेष भर दिला आहे. लेव्ही स्ट्रॉस हे संरचनात्मक दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते आहेत. संरचनात्मक प्रकार्यवादाचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे खेडेगावाचा, जातीनिष्ठ समाजव्यवस्थेचा पद्धतशीर अभ्यास करणे.

व्यक्तीचा सामाजिक दर्जा, परस्परांबदलचे प्रेम, सामाजिक संबंध, व्यक्तीची सामाजिक भूमिका त्यांचा अभ्यास करण्यासाठी संरचनात्मक प्रकार्यवाद उपयुक्त ठरतो. याचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे समाजाचे कार्यात्मक स्वरुपाचे संबंध जाणून घेण्यासाठी समाजाच्या व्यवस्थेचा अभ्यास याद्वारे केला जातो\


डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी ग्रामीण समुदायाच्या भौगोलिक परिसर, नैसर्गिक साधनसंपत्ती श्रमविभाजन, सामाजिक संबंध या सर्व दृष्टिने संपूर्ण खेडयाचा पद्धतशीर अभ्यास करणे. संरचनात्मक प्रकार्यवादाने शक्य होतो. हे दाखवून दिले.भारतीय समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये मोलाचे योगदान केले आहे याचा परिचय विद्यार्थ्यांना होणे गरजेचे आहे. भारतीय समाजशास्त्राच्या विकासात "सिंहाचा वाटा" म्हणून डॉ. एम. एन. श्रीनिवास" यांचा

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

उल्लेख केला जातो. भारतीय समाजशास्त्राला आधुनिकीकरणाकडे नेण्यात त्यांनी भगीरथ प्रयत्न केले. त्यांनी भारतीय खेड्याचा अभ्यास, जातींचा अभ्यास, सामाजिक व सांस्कृतीक परिवर्तन अस्पृयता निवारण, लोकरूढी व लोकगीते, ग्रामीण समाजातील धूंम अशा अनेक विषयांवर त्यांनी संशोधन केले. ग्रंथ लिहिले महिनो महिने एकाच गावात वास्तव्य करून सहभागी निरिक्षणाद्वारे वस्तुनिष्ठ तथ्य मिळवणे व रचनात्मक कार्यात्मक दृष्टिकोनाच्या आधारे त्याचे विवेचन करणे, निष्कर्ष काढणे यामुळे ते अग्रगण्य गणले जाते. व डॉ. घुर्ये यांचे शिष्य म्हणून आपले श्रेष्ठत्व दाखवले.

या घटकामध्ये एम. एन. श्रीनिवास यांनी मांडलेल्या समाजशास्त्रीय संकल्पनांचा अभ्यास केला जाणार आहे. त्यांनी जातीचा अभ्यास करून संस्कृतीकरण संकल्पने चे केलेले विवेचन अभ्यासले जाणार आहे. भारतीय समाजशास्त्राज्ञ डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी इ.स. १९५२ मध्ये दक्षिण भारतातील "कुर्ग" लोकांच्या सामाजिक व धार्मिक जीवनाचे विश्लेषण करताना संस्कृतीकरण ही संकल्पना मांडली. प्रभावी जातीबद्दल जे विचार मांडले त्यांचे विवेचन केले जाणार आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)



KOLHAPUR

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# उद्दिष्ठये

**या प्रकल्पाची उद्दिष्ठये पुढीलप्रमाणे :-**

1) डॉ. एम. एन . श्रीनिवास यांची संस्कृतीकरणाची संकल्पना विस्तृत स्वरूपात माहिती करून घेणे.

2) देशाच्या कानकोपऱ्यातील विविध कनिष्ठ जाती जाट, राजपूत, लिंगायत, मराण, नायर, गौंड, यासारख्या ब्राम्हणेतर जातींचे अनुकरण करताना आढळतात. म्हणून ब्राम्हणीकरणापेक्षा संस्कृतीकरण ही संकल्पना व्यापक आहे.

3) संस्कृतीकरणात धार्मिक विधिच्या अनुकरणास महतव प्राप्त करून देणे.

4) उच्च व कनिष्ठ जातीमध्ये समानतेची भावना निर्माण करणे.

5) संस्कृतीकरण ही एकमार्गी प्रकिया नसून दुहेरी प्रकिया आहे यात घेण्याची प्रकिया जास्त असते.

6) कनिष्ट जातींतील लोकांना उच्च स्तरावर जाण्यासाठी गतिशील बनविणे.

7) कनिष्ठ जातीमध्ये सुयोग्य बदल घडवून आणणे.

8) एम.एन. श्रीनिवास यांनी संस्कृतीकरण प्रक्रियेला गती देणाऱ्या घटकांवरही चर्चा केली आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)
KOLHAPUR

९)आर्थिक स्थितीशी संबंधित नाही हे संस्कृतीकरणाचे वैशिष्ठ्य आहे.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# अभ्यास पद्धती

मी या प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी पूढील पद्धतीचा वापर केला. त्या पद्धती पुढीलप्रमणे –

1) संदर्भ साहित्याचा अभ्यास पद्धती :-

मी या प्रकल्पाची माहिती व अभ्यास करण्यासाठी "बी.ए.भाग-तीन" मधील 'भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत' या पुस्तकातून संकल्पना मिळवली

भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत (India sociological Thinkers) या पूस्तकातील घटक क्रमांक.2 डॉ. एम.एन.श्रीनिवास या घटकातून डॉ. एम.एन.श्रीनिवास यांची "संस्कृतीकरणाची संकल्पना" यातून माहिती मिळवली

समाजातील जातीव्यवस्था यावर अभ्यास करून समाजातील लोकांमधील उच्च व कनिष्ठ दर्जा, मतभेद काढून टाकणे, जातींविषयी पौराणिक व जुनाट विचार नाहीसे करणे. समाजातील बदलांचे निरिक्षण करून जनजागृती करणे. तसेच संस्कृतीकरणामुळे लोकांच्या जनजीवनामध्ये घडून आलेले बदल याबाबतचा अभ्यास करणे.

2) माहिती पृथ्यकरण पद्धती :-

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

या प्रकल्पासाठी मी समाजामध्ये झालेल्या परिवर्तनाची माहिती समजून घेतली. त्यासाठी मी समाजव्यस्थतेतील रचनांचा अभ्यास केला, विविध समाजाविश्लेषकांना भेटी दिल्या जातीव्यवस्थेची कारणे जाणून घेऊन त्यावर संशोधन केले. आणि त्याची तुलना डॉ. एम.एन.श्रीनिवास यांच्या संस्कृतीकरणाशी केली. त्यासाठी मी विद्यापीठाच्या पुस्तकांचाही वापर केला. पूस्तकातून मला समाजजीवनावर संस्कृतिकरणामुळे आलेल्या परिणाम अभ्यासला. पूर्वीची स्थिती व सद्यस्थिती यातील घडून आलेल्या परिवर्तनाचा आढावा घेतला लोकांची विचारसरणी, जातीव्यवस्थेतील बदल, समाजात समानतेची निर्माण झालेली भावना यांवर अभ्यास केला.

अशाप्रकारे मी या घटकांवर अभ्यास करून हा प्रकल्प लिहिला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)
KOLHAPUR

## डॉ. एम.एन.श्रीनिवास यांच्या संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन :

भारतीय समाजशास्त्राच्या विकासाच्या प्रक्रियेत डॉ. एम. एन. श्रीनिवास यांचे योगदान अत्यंत मौलिक आहे. स्वतंत्र संशोधनात्मक कार्याच्या दृष्टिकोनाचा वापर करुन त्यांना समाजशास्त्राच्या अभ्यासाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला. भारतीय खेड्यांचा अभ्यास, प्रभावी जातीचा अभ्यास, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन, अस्पृश्यता निवारण, जातीव्यवस्थेचा राजकारणावरील प्रभाव, कुटुंब, विवाह, ग्रामीण भागातील कलह यासारख्या संवेदनशील विषयांचा अभ्यास, संशोधनात्मक मार्गाने करण्याचे महत्वाचे कार्य डॉ. श्रीनिवास यांनी केले. या सर्व घटकांची भारतीय समाजातील वास्तवता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964
KOLHAPUR

जातींतील व जमातीतील संस्कृतीचे अनुकरण करीत आहेत. या प्रक्रियेस विसंस्कृतीकरण असे म्हणतात. थोडक्यात, विविध प्रदेशांत व जाती-उपजातींमध्ये संस्कृतीकरणाची उलट प्रक्रिया घडतांना दिसून येते. म्हणून भारतीय पारंपरिक समाजातील परिवर्तन संस्कृतीकरण व पाश्चिमात्यिकरण या दोन प्रक्रियेतून झाल्याचे दिसते.

भारतातील प्राचीन आणि आधुनिक राजकीय व्यवस्था देखील संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेस अनुकूल आहेत. प्राचीन काळी क्षत्रिय असा वर्ग आहे. ज्यामध्ये अनेक वांशिक गट वेळोवेळी सामील झाले आहेत, ज्याचा मुख्य आधार संबंधित जातीसह राजकीय सत्ता आहे. या संदर्भात चरण किंवा भट जात विशेष भूमिका बजावत असत. आधुनिक काळात लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेने संस्कृतमध्येही बदल केला आहे.

पारंपरिक भारतीय समाजातील निम्न दर्जाच्या जातींमध्ये जी उर्ध्वगामी गतिशीलता घडून येते, त्याची अनेक कारणे आहेत. (१) पारंपरिक भारतात विवाहाचा आदर्श प्रकार म्हणून अनुलोम विवाहाला मान्यता होती. ज्यात उच्च

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

दर्जाचे वर आपल्यापेक्षा निम्न दर्जाच्या वधुशी विवाह करतात. या विवाहाच्या संबंधामुळे वधुपक्षाला उच्च दर्जा मिळाल्यासारखे वाटते. (२) एखादी निम्न जात किंवा आदिवासी जमाती जेव्हा काही ऐतिहासिक कामगिरी करतात, समाजाच्या संरक्षणाच्या दृष्टीने किंवा समाजसेवेच्या रूपात प्रचंड यशस्वी कामगिरी करतात, तेव्हा त्या जातीला किंवा जमातीला समाजात आदर आणि प्रतिष्ठा प्राप्त होते. ते दर्जा व प्रतिष्ठेच्या सोपानक्रमात उच्च स्थानी विराजमान होतात. (३) एखादी निम्न जात आपल्या स्वप्रयत्नाने शिक्षणात, व्यवसायात, राजकारणात यश प्राप्त करते. अशा जातींचाही समाजात दर्जा उंचावतो; मात्र त्या जातीच्या यशाला उच्च जातींकडून वैधता मिळेलच असे नाही. निम्न जाती जर उच्च जातींप्रमाणे वागू लागले (उदा. कपडे, सोने, पादत्राणे, छत्री, पगडी वापरू लागले), तर त्यांना उच्च जातींकडून अपमानित केले जाऊन प्रसंगी त्यांच्यावर हिंसाही केल्याचे अनेक उदाहरण आहेत.

संस्कृतीकरणातून होणारे सामाजिक परिवर्तन हे संथगतीने सुरू असते. या परिवर्तनाचे उत्तरदायी घटक हे जाती अंतर्गतच असतात. ते बाह्य घटक वा स्रोताद्वारे होत नसते. विशेष म्हणजे संस्कृतीकरण हे जातींच्या लक्षणांमध्ये होणारे

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)

परिवर्तन असते. ते जाती सोपानक्रमात कोणतेच फेरबदल करणारे नसतात. उदा., एखाद्या जातीने जर मांसाहार व मद्यपानाचा निषेध केला, तर तिच्या या पवित्रतेच्या अनुकरणामुळे ती उच्च जात होत नसून तिची आहे तीच जात असते.

संस्कृतीकरणाच्या काही मर्यादाही अभ्यासकांनी दाखवून दिल्या आहेत. देशातील प्रादेशिक विविधता लक्षात घेता संस्कृतीकरण ही संकल्पना सरधोपटपणे सामाजिक बदलांचे विश्लेषण करण्यासाठी वापरता येऊ शकते, याबद्दल त्यांनी प्रश्न उपस्थित केले. संस्कृतीकरण ही जाती व्यवस्थेतील अंतर्विरोध व गुंतागुंतीच्या व्यावहारिक पातळीवरील संदर्भांचे आणि प्रक्रियांचे एक प्रकारे सपाटीकरण करते. संस्कृतीकरण या संकल्पनेनुसार सामाजिक बदल हा केवळ निम्न जातींनी उच्च जातींचे अनुकरण केल्याने घडतो, असे मानून दलित बहुजनांचे बौद्धिकत्वच नाकारले आहे.

संस्कृतीकरण ही उगमापासून वादातित राहिली असली, तरी नंतरच्या काळात देशातील उच्च जातींच्या प्रभुत्वाला संस्थात्मक पातळीवर जे आव्हान उभे राहिले, त्यासंदर्भात दलित-बहुजन सिद्धांतकारांनी या संकल्पनेची जोरदार चिकित्सा केली आहे. सामाजिक शास्त्राच्या पाश्चिमात्त्य परंपरांवरील

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

अवाजवी अवलंबित्वाची गेल्या काही काळात जी चिकित्सा उभी राहिली, त्या संदर्भात एतद्देशीय परंपरेतील संकल्पना म्हणून संस्कृतीकरणाला एक वेगळे वलय प्राप्त झाले; परंतु या एतद्देशीय संकल्पनेच्या वैश्विकीकरणाची प्रक्रिया फारशी झालेली दिसते.

**डॉ. एम. एन. श्रीनिवास यांच्ये अन्य कार्य :**

भारतीय समाजातील जाती व्यवस्था, अस्पृश्यता निवारण्याचे कार्य, राखीव जागांचा प्रश्न, भूमिहीनच्या समस्या, प्रचंड वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येचा प्रश्न इ. सर्व प्रश्नांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या क्रांतीची नोंद घेणारा 'on living in a revolution' लेख 1992 प्रकाशित झाला. या लेखात सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेवर प्रकाश टाकण्यात आला.

डॉ. एम. एन. श्रीनिवास यांनी संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोनाचा पुरस्कार करुन समाजरचनेचा अभ्यास करायचा असेल तर त्यासाठी ढोबळमानाने समाजरचना विचारात घेऊन चालनार नाही. त्यासाठी संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन व्यवहारात स्वीकारण्याची गरज आहे. असे मत व्यक्त केले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# निष्कर्ष

श्रीनिवास यांचे भारतीय समाजशास्त्रामधील संशोधन व क्षेत्राभ्यास महत्त्वाचा आहे. त्यांनी दक्षिण भारतातील कुर्ग ज्ञातिव्यवस्थेतील परिवर्तनाचा चिकित्सक अभ्यास केला आणि तत्संबंधी शोधनिबंध प्रसिद्ध केले. तेथील तेरा कनिष्ठ जातींनी उच्च जातीचे, म्हणजे ब्राह्मण जातीचे अनुकरण करून आपला समाजव्यवस्थेतील दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला. त्याला 'ब्राह्मणीकरणाची प्रकिया ' असे त्यांनी म्हटले आहे. तेथील कनिष्ठ जाती ब्राह्मणांचे आचार-विचार, प्रथा-परंपरा, रीतिरिवाज इत्यादींचे अनुकरण करतात व आपला सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करतात. ब्राह्मण नसलेल्या ठिकाणी आर्थिक, राजकीय व संख्यात्मक दृष्टया बलिष्ठ असलेल्या स्थानीय जातीचे अनुकरण केले जाते. ही परिवर्तनाची प्रकिया केवळ कुर्ग समुदायापुरतीच मर्यादित नसून, जवळजवळ सर्वच प्रादेशिक समाजांतील कनिष्ठ जातींत त्यांना आढळून आल्यावर त्यांनी परिवर्तनाच्या या प्रकारास ' सांस्कृतिकीकरण ' ही संज्ञा वापरली. तसेच त्यांनी पश्चिमीकरण व आधुनिकीकरण या संकल्पनांचीही उकल केली आहे. पश्चिमीकरण म्हणजे पाश्चिमात्यांच्या संस्कृतीचे भारतीयांनी केलेले अनुकरण होय. हाही एक व्यापक डॉ. श्रीनिवास यांनी मांडला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# संदर्भसूची

मला या प्रकल्पासाठी मार्गदर्शक एच.व्ही.चामे सर या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले आहे.

**संदर्भ साहित्य :-**

मी या प्रकल्पाची माहिती समाजातील सद्यस्थिती, इंटरनेट, काही पुस्तके, नोटस् अशाप्रकारे मिळवली.

**वेबसाईट :-** www.wikipedia.com, मराठी विश्वकोश

**पुस्तके :-** भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत, विद्यापीठ पुस्तके

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

KOLHAPUR

# प्रमाणपत्र

विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (स्वायत्त) येथे कला शाखा भाग ३ च्या समाजशास्त्र विभागात शिकत असून असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करतो आम्ही आम्ही सादर केलेला प्रकल्प स्वतःच्या अनुभवावर व आधारित आहे मी सत्र ६ च्या अंतर्गत मूल्याकनासाठी सादर केलेला प्रकल्प श्री.एम.एन.श्रीनिवास यांच्या संस्कृतीकरणाविषयक विचारांचा अभ्यास हा विषय उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेऊन तयार केला आहे. पूर्वी सादर झालेल्या कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करून अथवा इतर कोणाकडून ही लिहून घेऊन हा प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही.

**स्थळ** :- कोल्हापूर

**दि.** :-

KOLHAPUR

विवेकानंद कॉलेज,

कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

मार्गदर्शक

प्रा. एच. व्ही. चामे

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)